महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
MAHARASHTRA HOUSING AND
AREA DEVELOPMENT AUTHORITY

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

म्हाडा
MHADA

जा.क्र.उपा/प्रा./उपमुअभि/बीडीडी/मुं.मं./ ८७ /२०२४
दिनांक : १४/०३/२०२४

प्रति,
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
तथा अध्यक्ष, शक्ती प्रदत्त समिती,
बीडीडी चाळी पुनर्विकास,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

**(मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत)**

**विषय :** मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत.
--- शक्ती प्रदत्त समितीच्या दि. १४/०३/२०२४ रोजी झालेल्या
१८ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी देणेबाबत.

**संदर्भ :-** १. मा. उपाध्यक्ष / म्हाडा यांचे पत्र क्र. ८४, दि. १३/०३/२०२४.
२. श्री. हेमंत धनु, मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक यांचे दि. १३/०३/२०२४ रोजीचे पत्र.

महोदय,

म्हाडातर्फे राबविण्यात येणाऱ्या मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाचे नियंत्रण व वेळोवेळी आढावा घेण्यासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन अध्यक्ष/ शक्ती प्रदत्त समिती / बीडीडी चाळी पुनर्विकास यांचे अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समितीची १८ वी बैठक दि. १४/०३/२०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता मा. मुख्य सचिवांचे समिती कक्ष, सहावा मजला, मंत्रालय येथे संपन्न झाली.

सदर बैठकीच्या इतिवृत्ताचा मसुदा अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

मान्यतेसाठी सविनय सादर.

आपला विश्वासू,
14/3/24
(संजीव जयस्वाल)
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / म्हाडा
तथा सदस्य सचिव - शक्ती प्रदत्त समिती,
बीडीडी चाळी पुनर्विकास.

सोबत : दि. १४/०३/२०२४ रोजीच्या
बैठकीचे प्रारुप इतिवृत्त.

गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दूरध्वनी ६६४० ५०००
फॅक्स नं. : ०२२-२६५९२०५८

Griha Nirman Bhavan, Kalanagar, Bandra (East), Mumbai-400 051.
Phone : 66405000
Fax No. : 022-26592058 Website : www.mhada.maharashtra.gov.in

**विषय : म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत दि. १४/०३/२०२४ रोजी झालेल्या मा. शक्ती प्रदत्त समितीच्या १८ व्या बैठकीचे प्रारुप इतिवृत्त.**

बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाच्या संदर्भात गठित करण्यात आलेल्या शक्ती प्रदत्त समितीची १८ वी बैठक दि. १४/०३/२०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन तथा अध्यक्ष/ शक्ती प्रदत्त समिती / बीडीडी चाळी पुनर्विकास यांचे अध्यक्षतेखाली मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे समिती कक्षामध्ये संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्रीमती सुजाता सौनिक यांचे प्रतिनिधी (श्री. अनुप सिंह) - मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग
२. श्री. ओ. पी. गुप्ता - मा. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग
३. श्रीमती वल्सा नायर सिंह - मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग
४. श्री. राजेश कुमार - मा. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग
५. श्री. असिम गुप्ता - मा. प्रधान सचिव (नवि-१), नगरविकास विभाग
६. श्रीमती सुवर्णा केवले - मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग
७. श्री. संजीव जयस्वाल - मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा तथा सदस्य सचिव - शक्ती प्रदत्त समिती

सदर बैठकीत चर्चा करावयाच्या मुद्दयांची कार्यसूची सन्माननीय सदस्यांना सादर करण्यात आली होती. कार्यसूचीत नमूद केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने सांगोपांग चर्चा होऊन पुढील निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | विषय | झालेली चर्चा व समितीचे निर्णय / निर्देश |
|---|---|---|
| १. | समितीच्या १७ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी देणेबाबत. | शक्ती प्रदत्त समितीच्या १७ व्या बैठकीचे इतिवृत्तास समितीने मंजूरी दिली. |
| २. | वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पासाठी प्रत्येक पुनर्वसन सदनिकेसाठी १ चारचाकी वाहन पार्किंग व्यवस्था करणेबाबत. | मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा तथा सदस्य सचिव - शक्ती प्रदत्त समिती, बीडीडी चाळी पुनर्विकास यांनी प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती दिली.<br>सदर बैठकीमध्ये सादर करण्यात आले की, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ नुसार मध्य उत्पन्न गटाकरीता ४ सदनिकांसाठी १ पार्किंगची तरतुद आहे. बीडीडी पुनर्वसन प्रकल्पाकरीता २ सदनिकांमध्ये १ पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे, परंतु स्थानिक रहिवाशांच्या मागणीनुसार तसेच मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांनी दि. २८/१२/२०२३ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार प्रत्येक सदनिकेसाठी १ पार्किंगची व्यवस्था करणेबाबतचा प्रस्ताव तयार केला असून या प्रस्तावानुसार सदर अतिरिक्त पार्किंग व्यवस्थेसाठी अंदाजे रु. ५२०.२७ कोटी अतिरिक्त खर्च येणार आहे.<br>याबाबत चर्चेअंती मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन तथा अध्यक्ष/ शक्ती प्रदत्त समिती / बीडीडी चाळी पुनर्विकास यांनी प्रत्येक सदनिकेस १ पार्किंग व्यवस्था देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी दिली. तसेच सदर अतिरिक्त रु. ५२०.२७ कोटी खर्च म्हाडाने करावा असेही निर्देश दिले. |

| | | |
|---|---|---|
| | | तसेच शासनास भविष्यात देय असलेल्या रक्कमेत घट होणार नाही, या अटीस अधिन राहुन मान्यता देण्यात आली.<br>यानंतर मा. उपाध्यक्ष / म्हाडा यांनी असे सादर केले की, वरळी बीडीडी पुनर्वसन सदनिकेकरीता प्रत्येकी १ चारचाकी वाहन पार्किंग व्यवस्था मंजूर केल्यास, नायगांव व ना. म. जोशी मार्ग, बीडीडी चाळींमधील रहिवाशी सुध्दा वरळी बीडीडी प्रकल्पाच्या धर्तीवर पुनर्वसन सदनिकेकरीता १ चारचाकी वाहन पार्किंगची मागणी करण्याची शक्यता आहे. नायगांव व ना. म. जोशी मार्ग बीडीडी चाळ पुनर्वसन इमारतीमध्ये ३ बेजमेंट आहेत व त्यांचे प्रत्यक्ष बांधकाम सुरु झालेले आहे. तसेच पुनर्वसन प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील इमारतींचे बेसमेंटचे कामही पूर्ण होत आले असल्यामुळे नायगांव व ना. म. जोशी मार्ग येथे पुनर्वसन सदनिकेकरीता प्रत्येकी १ चारचाकी वाहन पार्किंग व्यवस्था त्यांच्या पुनर्वसन इमारतींमध्ये सद्यस्थितीत करणे शक्य नाही. याबाबत मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन तसेच उपस्थित सदस्यांनी सहमती दर्शविली.<br>तसेच विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ नुसार, वरळी येथील ४ पुनर्वसन सदनिकेसाठी १ पार्किंग देणे आवश्यक असून प्रस्तावित अतिरिक्त पार्किंग व्यवस्थेसाठी अधिमूल्य भरणे आवश्यक आहे. परंतु म्हाडाच या प्रकल्पाचा नियोजन प्राधिकरण असल्याने यापूर्वीच सदर अतिरिक्त अधिमूल्य भरण्यापासून म्हाडास सवलत देण्यात आली आहे, ही बाब मा. उपाध्यक्ष / म्हाडा यांनी समितीपुढे सादर केली. |

या चर्चेनंतर मा. अध्यक्षांच्या अनुमतीने उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

14/3/24.

(संजीव जयस्वाल)
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / म्हाडा तथा
सदस्य सचिव - शक्ती प्रदत्त समिती / बीडीडी चाळी पुर्नविकास.

(वल्सा नायर सिंह)
मा. अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन तथा
सदस्य / शक्ती प्रदत्त समिती / बीडीडी चाळी पुर्नविकास.

(नितीन करीर)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन तथा
अध्यक्ष/ शक्ती प्रदत्त समिती / बीडीडी चाळी पुर्नविकास.